आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
५ ऑक्टोबर २०२५ - रविवार

**ठळक बातम्या**

- कफ सिरपच्या सेवनानं काही मुलांचे मृत्यू झाल्याच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने बोलावली सर्व राज्यांच्या आरोग्य सचिवांची बैठक

- केंद्रीय गृहमंत्री अमित शहा महाराष्ट्राच्या दौऱ्यावर

- गेल्या ६ वर्षांत देशभरात १७ कोटीहून जास्त रोजगार निर्मिती

- गाझा- शांतता प्रस्तावावर आज कैरो इथं इस्त्रायल, हमास आणि अमेरिका यांची बैठक

- पश्चिम बंगालमधे अतिवृष्टीमुळे किमान २० जणांचा मृत्यू

**आणि**

- शक्ती चक्रीवादळाच्या प्रभावामुळे महाराष्ट्रात जोरदार पावसाची शक्यता/ देशाच्या अनेक भागात मुसळधार पावसाचा इशारा

<><><><>

राजस्थान आणि मध्य प्रदेशमध्ये कफ सिरपच्या सेवनानं काही मुलांचे मृत्यू झाल्याच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने सर्व राज्यांच्या आरोग्य सचिवांची बैठक बोलावली आहे. आज संध्याकाळी चार वाजता आरोग्य मंत्रालयाच्या सचिवाच्या अध्यक्षतेखाली ही बैठक होणार असून सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य सचिव, आरोग्य सचिव यात सहभागी होणार आहेत. तसंच औषध नियंत्रक देखील सहभागी होतील. दूरदृश्यप्रणालीद्वारे होणाऱ्या या बैठकीत कफ सिरपचा गैरवापर तसंच औषधांची गुणवत्ता यावर चर्चा होणार आहे.

दरम्यान, दोन वर्षांहून कमी वयाच्या बालकांना सर्दी-खोकल्याची औषधं दिली जाऊ नयेत, अशा सूचना केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं काल सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना दिल्या.

<><><><>

वस्तू आणि सेवा परिषदेने जीएसटी कररचनेत केलेल्या सुधारणा २२ सप्टेंबरपासून लागू झाल्या आहेत. यामुळे समाजातल्या सर्व घटकांना लाभ झाला आहे. आज ऐकूया वस्त्रोद्योग उद्योगाविषयी...

**---व्हीसी---**

*(सामान्य माणसावरचा भार कमी करण्यासाठी केंद्र सरकारने वस्त्रोद्योगावरचा जीएसटी कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. नव्या कररचनेनुसार हस्तनिर्मित धाग्यांवरील जीएसटी १८ टक्क्यावरून ५ टक्के करण्यात आला आहे. याशिवाय अडीच हजारांपेक्षा कमी किमतीच्या रेडिमेड कपड्यांवरील जीएसटी ५ टक्के झाला आहे. यामुळे सर्वसामान्यांना विविध फॅशनचे कपडे परिधान करणं सहज परवडणार आहे. वस्त्रोद्योगावरील जीएसटी कमी झाल्यामुळे कपड्यांचे दरही कमी होणार आहेत. यामुळे कपड्यांची मागणी वाढेल आणि उत्पादनही वाढेल. तसंच निर्यातीतही वाढ होणार आहे. याचा सगळ्यात मोठा फायदा मध्यमवर्गीय आणि कनिष्ठ मध्यमवर्गीयांना होणार आहे. यामुळे भारताला जागतिक स्तरावर वस्त्रोद्योगाचं केंद्र बनायला मोठी मदत मिळेल यात शंका नाही.)*

**<><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज महाराष्ट्राच्या दौऱ्यावर असून त्यांच्या हस्ते अहिल्यानगर मध्ये प्रवरानगर इथं डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचा नूतनीकरण सोहळा झाला. तर लोणी इथं त्यांच्या हस्ते सहकार चळवळीचे जनक पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील आणि लोकनेते, पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं अनावरण झालं. याशिवाय देशातला पहिला सहकारी कॉम्प्रेस बायो गॅस प्रकल्प आणि स्प्रे ड्रायर पोटॅश ग्रेन्युएल प्रकल्पाचं उदघाटन देखील त्यांच्या हस्ते झालं. यावेळी आयोजित शेतकरी मेळाव्याला अमित शाह संबोधित करणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ आणि राज्यातले मंत्री आणि मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित आहेत.

तत्पूर्वी अमित शहा यांचं काल शिर्डी इथं आगमन झाल्यानंतर रात्री उशिरा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी

त्यांची चर्चा झाली. त्यानंतर आज सकाळी अमित शहा यांनी शिर्डी इथं साईबाबांचं दर्शन घेतलं.

<><><><>

गेल्या सहा वर्षात भारतात १७ कोटी नवीन रोजगार निर्मिती झाली आहे. कामगार आणि रोजगार मंत्रालयाने दिलेली आकडेवारी सांगते की भारतातल्या रोजगारांची संख्या २०२३-२४ या वर्षात ६४ कोटी ३३ लाख झाली आहे. २०१७-१८ मध्ये ही संख्या ४७ कोटी ५० लाख होती. म्हणजे गेल्या ६ वर्षात नोकऱ्यांमध्ये १६ कोटी ८३ लाख इतकी वाट झाली आहे, असं मंत्रालयानं म्हटलं आहे. बेरोजगारीचा दर देखील २०१७-१८ मधील ६% वरून २०२३-२४ मध्ये तीन पूर्णांक दोन दशांश टक्के इतका घसरला आहे.

<><><><>

भुवनेश्वर इथं नमो सेमिकंडक्टर प्रयोगशाळा उभारण्याला इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मान्यता दिली आहे. या प्रयोगशाळेसाठी ४ कोटी ९५ लाख रुपये खर्च येणार आहे. सेमिकंडक्टर प्रशिक्षण, रचना आणि निर्मितीसाठी आवश्यक उपकरणं या प्रयोगशाळेत असतील.

<><><><>

बिहारमधल्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी निवडणूक आयोगानं आज तिथल्या विविध प्रशासकीय यंत्रणा, पोलीस अधिकारी, केंद्रीय पोलीस दल आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांसमवेत बैठका घेतल्या. निवडणुकीच्या काळात, काळा पैसा, मद्य आणि अंमली पदार्थांचा धोका ओळखून करायच्या उपाययोजनांबाबत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या अध्यक्षतेखालील पथकानं त्यांच्याशी संवाद साधला. निवडणुका मुक्त, निःपक्षपाती आणि शांततापूर्व वातावरणात व्हाव्या यासाठी उपस्थितांनी मतं मांडली.

<><><><>

गाझामधे शांतता प्रस्थापित करण्यासाठी अमेरिकेने दिलेल्या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी आज कैरो इथं इस्त्रायल, हमास आणि अमेरिकेचे प्रतिनिधी यांच्यात बैठक होणार आहे. या बैठकीत इस्त्रायलने कैद केलेले पॅलेस्टिनी नागरिक आणि हमासने ओलीस

ठेवलेले इस्रायली नागरिक यांच्या देवाणघेवाणीबाबतही चर्चा होईल, असं इजिप्तच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं म्हटलं आहे.

वाटाघाटी सुरू असतानाही इस्रायलने गाझावर हल्ले सुरूच ठेवले आहेत, या हल्ल्यात गेल्या चोवीस तासात ७० जणांचा मृत्यू झाला आहे. याआधीही इस्रायलने वाटाघाटी नाकारून गाझावर हल्ले केले होते.

**<><><><>**

पश्चिम बंगालमधे मुसळधार पाऊस होत असून भूस्खलनाच्या घटनांमधे किमान २० जणांचा मृत्यू झाला. तिस्ता नदीला पूर आला आहे, राष्ट्रीय महामार्गांवर पाणी साचलं आहे. शेतात आणि घरात पाणी शिरलं आहे. दार्जिलिंग, कुरेसाँग, मिरिक कालिंपाँग आणि सिक्किममधे जनजीवन विस्कळीत झालं असून एनडीआरएफची पथकं आपद्ग्रस्त भागात मदतकार्य करत आहेत.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. केंद्रसरकार परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे आणि दुर्घटनाग्रस्तांना तातडीने मदत पुरवली जाईल असं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे.

**<><><><>**

ईशान्य अरबी समुद्रात निर्माण झालेल्या शक्ती या चक्रीवादळाची तीव्रता वाढत असून पुढच्या काही दिवसात ते अधिक शक्तिशाली होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी चक्रीवादळाचा इशारा देण्यात आला आहे. ७ ऑक्टोबरपर्यंत उत्तर कोकण किनारपट्टी भागात जोरदार वाऱ्यांसह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. समुद्रात सध्या १०० किमी प्रतितास वेगाने वारे वाहत असल्याने मच्छिमारांनी ७ ऑक्टोबरपर्यंत समुद्रात जाऊ नये असा इशारा दिला आहे.

देशाच्या इतर भागातही मान्सूनचा परतीचा प्रवास होत असतानाच पश्चिमी वाऱ्यांमुळे तसंच बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे अनेक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. राजस्थानमध्ये मुसळधार पाऊस आणि गारपीटीचा इशारा देण्यात आला असून, अनेक जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. बिहारमधील १० जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट जारी केला गेला आहे, तर पाटणा आणि अन्य पाच जिल्ह्यांत

ऑरेंज अलर्ट लागू आहे. बिहारमधे  सतत तीन दिवस पाऊस होत असून अनेक भागात पूरस्थिती निर्माण झाली आहे.

उत्तर प्रदेशातही २७ जिल्ह्यांमध्ये पावसाचा इशारा देण्यात आला आहे. पंजाबमध्ये ११ जिल्ह्यांना मुसळधार पावसाचा, तर १३ जिल्ह्यांना पूरस्थितीचा इशारा देण्यात आला आहे. रावी, बियास आणि सतलज नद्यांवरील पाण्याची पातळी वाढल्याने प्रशासनाला सतर्क राहण्याचे आदेश दिले गेले आहेत.

मध्यप्रदेशातही मान्सून परतीच्या टप्प्यात असून, १० ऑक्टोबरपर्यंत राज्यातून पूर्णपणे निघून जाण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. काही जिल्ह्यांत अजून रिमझिम आणि हलका पाऊस सुरू राहील. जर प्रणाली मजबूत राहिली, तर काही भागांत पुन्हा मुसळधार पावसाचा अनुभव येऊ शकतो.

<><><><>

नवी दिल्लीत झालेल्या दिव्यांगांसाठीच्या अथलेटिक्स स्पर्धांमधे भारतानं काल ३ पदकं जिंकली त्यामुळे आता भारताची पदक संख्या १८ झाली आहे. यामध्ये ६ सुवर्ण, ७ रौप्य आणि ५  कांस्य पदके आहेत. ही भारताची ऐतिहासिक कामगिरी असून पदकतालिकेत भारत सहाव्या स्थानी आहे.

सर्वाधिक १२ सुवर्णपदकं ब्राझिलच्या संघाला मिळाली. ९ सुवर्णपदकं मिळवून चीन दुसऱ्या तर ८  मिळवून पोलंड तिसऱ्या क्रमांकावर राहिला.

<><><><>

महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज, भारत-पाकिस्तान लढत रंगणार आहे. श्रीलंकेत कोलंबो इथं दुपारी तीन वाजता हा सामना सुरु होणार आहे. पाकिस्तानबरोबर आतापर्यंत झालेले सर्व ११ एकदिवसीय  सामन्यांमध्ये भारताचा महिला संघ विजयी झाला आहे.

//<><><><>//